# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/ ३७३, ३८०, ३८१, ३९९, ४०० –२०१०–११/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सिदराया मुरगेप्पा बसर्गी ( केस क्र.३७३/२०१०–११)<br>मु.पो. उटगी, जत, जि. सांगली | |
| २) | श्री. विश्वनाथ सुबराव जगताप, (केस क्र.३८०/२०१०–११)<br>मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली | |
| ३) | श्री. जगन्नाथ सुबराव जगताप, (केस क्र.३८१/२०१०–११)<br>मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| ४) | सौं. उज्वला रंगराव सावंत, ( केस क्र. ३९९/२०१०–११)<br>मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली | |
| ५) | श्री. बनाप्पा संभा निळे,( केस क्र. ४००/२०१०–११)<br>मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली | |

**विरूध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या पाचही तक्रारीं अनुक्रमे ३७३/१०–११, ३८०/१०–११, ३८१/१०–११, ३९९/१०–११ व ४००/२०१०–११ यामध्ये तक्रारदाराची मागणी एकच आहे व कायद्याचा मुद्दा एकच आहे म्हणून तक्रारदारांचे प्रतिनिधी व वि.प.च्या अधिकाऱ्यांच्या संमत्तीने एकत्रित निर्णय करण्यात येत आहे. या पाचही तक्रारी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केलेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

केस क्र. ३७३/२०१०–११

श्री. सिदराया मुरगेप्पा बसर्गी, मु.पो. उटगी, जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. ११.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपल्या गट क्र. ७९/३ मध्ये शेतीपंपासाठी नवीन वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ४०००/– पावती क्र. ५३२१८५१ दि. २४.८.२००९ रोजी भरले. कपॅसिटर टेस्टींग करुन चाचणी अहवाल दि. ५.१.२०१० रोजी दिला आहे. परंतु ग्राहकास चाचणी अहवाल खोटा असल्याचे ५.१.२०११ ला पत्राने कळविले आहे. अशी तपासणी १ वर्षानंतर केलेली आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. दि. १३.५.२०१० ला तक्रार दाखल केली त्यामध्ये दि. ३०.६.२०१० ला आदेश झाले. अंतर्गत कक्षाने कृती मानके विनियमानुसारच्या कालावधीत का करुन नमूद असलेल्या कालावधीत वीज पुरवठा करण्यात यावा अन्यथा विलंबापोटी नियमाप्रमाणे भरपाई देणेत यावी असे आदेश दिले. ग्राहकाने वीज पुरवठा मिळावा व तो देण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी. हा दावा कृती मानके पूर्ण झालेच्या आंत दोन महिन्यात करता येतो, त्यामुळे मागणीस विलंब नाही असे गाऱ्हाण्यात कथन केले.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि.५.१.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. त्यांचे ०.५४ कि.मी. लघुदाब वाहिनी काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शन ३१.३.२०११ पूर्वी देण्याची व्यवस्था करीत आहोत, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

केस क्र. ३८०–२०१०–११

श्री. विश्वनाथ सुबराव जगताप, मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २०.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले.

विश्वनाथ सुबराव जगताप यांनी आपले शेत जमीन गट क्र. २३१ मध्ये ३ अश्वशक्ती वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ४०००/– पावती क्र. ५३३९४१४ दि. २२.२.२०१० रोजी भरले. त्यानंतर ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ४.३.२०१० ला तक्रार दाखल केली त्यामध्ये दि. ३.५.२०१० ला आदेश झाले. ग्राहकाने आपल्या तक्रारीत संघटनेने मा. विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या केस क्र. १५/२००७ चा संदर्भ देवून दि. ४.७.२००७ ची सुनावणी व मा.आयोगाच्या निरीक्षणाचा उल्लेख केला आहे. कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी जागेवर संच मांडणी नसल्याचे कळविले आहे.

परंतु लघुदाब वाहिनीचे काम करुन विनियमातील विहीत कालावधीत विद्युत पुरवठा द्यावा अथवा नियमाप्रमाणे भरपाई द्यावी असे अंतर्गत कक्षाने आदेशात म्हटले आहे. ग्राहकाने संख उप विभागाकडे दि. २०.७.२०१० ला चाचणी अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे अर्ज दिल्याच्या तारखेपासून ती महिन्यात वीज जोडणी मिळाली नसल्याने वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे मान्य केले आहे. ग्राहकाचे ०.२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शन ३१.३.२०११ पूर्वी देण्याची व्यवस्था करीत आहोत, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

केस क्र. ३८१ –२०१०–११

जगन्नाथ सुबराव जगताप सुबराव जगताप, मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे दि. २०.१.२०११ वितरण कंपनी विरुध्द गाऱ्हाणे दाखल केले.

ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. २३१ मध्ये ५ अश्वशक्ती वीज मागणी करुन वि.प.ने दिलेले चलन रु. ५०००/– पावती क्र. ५३३९४१५ दि. २२.२.२०१० रोजी भरले. त्यानंतर ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ४.३.२०१० ला तक्रार दाखल केली त्यामध्ये दि. ३.५.२०१० ला आदेश झाले. ग्राहकाने आपल्या तक्रारीत संघटनेने मा. विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या केस क्र. १५/२००७ चा संदर्भ देवून दि. ४.७.२००७ ची सुनावणी व मा.आयोगाच्या निरीक्षणाचा उल्लेख केला आहे. ग्राहकाने संख उप विभागाकडे दि. २०.७.२०१० ला चाचणी अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे अर्ज दिल्याच्या तारखेपासून ती महिन्यात वीज जोडणी मिळाली नसल्याने वीज पुरवठा मिळावा व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. २०.७.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.१२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शन ३१.३.२०११ पूर्वी देण्याची व्यवस्था करीत आहोत, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

केस क्र. ३९९ –२०१०–११

सौं. उज्वला रंगराव सावंत, मु.पो. कोत्येन बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे आपली शेत जमीन गट क्र. ४४३ येथे शेतीपंपास ५ अश्वशक्ती वीज पुरवठा मिळावा यासाठी रु. २५००/– +२५००/– = रु. ५०००/– पावती क्र. ५३४००८९ दि. ८.३.२०१० नुसार भरले आहेत. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.६७० दि. ११.११.२०१० ला दाखल केली.

त्यामध्ये कक्षाने आदेश केले नाहीत, म्हणून मंचाकडे प्रतिनिधीमार्फत दि. २४.१.२०११ ला तक्रार दाखल केली. त्यामध्ये वीज जोडणी मिळावी व झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली. ग्राहकाने आपल्या तक्रारीत कृती मानके विनियम २००५ चे कलम ४.५ वर भर दिला आहे, त्याचप्रमाणे विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील कलम ६ चा उल्लेख केला आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. २७.४.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शनचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

<u>केस क्र. ४०० –२०१०–११</u>

श्री. बनाप्पा संभा निळे, मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे आपली शेत जमीन गट क्र. ४४३ येथे शेतीपंपास ५ अश्वशक्ती वीज पुरवठा मिळावा यासाठी रु. २५००/– +११००/– +१००/– = रु. ३७००/– पावती क्र. ४१३१५ दि. १६.१०.२००६ नुसार भरले आहेत. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ५७८ दि. १.१०.२०१० ला दाखल केली. त्यामध्ये कक्षाने आदेश केले नाहीत, म्हणून मंचाकडे प्रतिनिधीमार्फत दि. २४.१.२०११ ला तक्रार दाखल केली. त्यामध्ये वीज जोडणी मिळावी व झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली. ग्राहकाने आपल्या तक्रारीत कृती मानके विनियम २००५ चे कलम ४.५ वर भर दिला आहे, त्याचप्रमाणे विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील कलम ६ चा उल्लेख केला आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३.३.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने चलन भरल्याचे व दि. ५.५.२०१० ला चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. ग्राहकाचे ०.३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या व चाचणी अहवाल दिलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. त्यामध्ये वर्षवार जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे. सदर काम दि. ३१.३.२०११ पर्यत पूर्ण करणेचे आहे, त्यामुळे ग्राहकाचे कनेक्शनचे काम जेष्ठतायादीनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येईल, त्यामुळे ग्राहक भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हटले आहे.

या पाचही तक्रारींची सुनावणी मंचासमोर दि. ७.३.२०११ ला घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, श्री. टिळक, सहाय्यक अभियंता व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी यांनी वि.प. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयशी ठरली आहे. ग्राहकांनी चलन भरुन चाचणी अहवाल दिल्यानंतरही मुदतीत वीज जोडणी दिलेली नाही. त्यामुळे विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली.

वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज जोडणी देत आहे असे मंचासमोर सांगितले. तथापि, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांचे दि. ५.३.२०११ चे मंचाला अग्रेषित केलेले पत्र मंचामध्ये दाखल केले. त्यामध्ये एकूण १६ केसेस पैंकी या ५ केसेसमध्ये यापूर्वी लेखी अहवालात दिलेला मजकूर बदल करुन दि. ३१.३.२०११ पर्यत वीज जोडणी देण्याचा प्रयत्न करीत आहोत असे म्हणणे दाखल केले आहे.

वरीलविवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या पाचही तक्रारीमध्ये ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देणेचे वि.प.स आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

या पाचही तक्रारी सुनावणीस घेतल्या असतां, वि.प.च्या अधिकाऱ्यांनी या सर्व तक्रारीमध्ये चलन दि. ३१.३.२०१० पूर्वी भरल्याचे मान्य केले आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांना वरिष्ठ कार्यालयाचे आदेशास अनुसरुन या सर्व केसेसमध्ये दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज कनेक्शन्स देत आहोत असे सांगितले. या पाचही तक्रारीमध्ये वि.प.ने लेखी अहवालात म्हणणे दाखल केले आहे, परंतु सुनावणीचेवेळी कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांच्या सहीने दाखल दि. ५.३.२०११ च्या पत्रात ' प्रयत्न करीत आहोत ' अशाप्रकारची दुरुस्ती केल्याचे दिसते. या ठिकाणी वि.प.चे अधिकारी श्री. कांबळे हे आपल्या वरिष्ठ कार्यालयाचे परिपत्रकाविरुध्द भूमिका मंचासमोर मांडत आहेत याचे आश्चर्य वाटते. खरेतर वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार सध्या दि. ३१.३.२०१० पर्यंत पैंसे भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी देण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे असे म्हटल्यानंतर ' प्रयत्न करीत आहोत ' असे पत्राद्वारे मंचासमोर उपस्थित न राहता लेखी पत्र देणे निश्चितपणे कार्यकारी अभियंता श्री. कांबळे यांच्याकडून अपेक्षित नाही. असा वेगळा बचाव ते घेवू शकत नाहीत आणि जरी घेतला तरी नंतरचा बचाव ' प्रयत्न करीत आहोत ' हा विचारांत घेता योणार नाही आणि त्याकडे फारसे गांभीर्याने पाहता येणार नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार मंचाला आदेश करीत असतांना ठराविक काळात (Time bound programme ) ग्राहकाचे गाऱ्हाणे दूर करण्याचे आदेश देता येतात. वि.प.ने दि. ३१.३.२०११ पर्यंत वीज जोडणी देतो असे म्हणणे दाखल केल्यावर त्यानंतर ' प्रयत्न करीत आहोत ' असे After thought म्हणणे सादर करणेत येत आहे.

या सर्व ग्राहकांच्या वीज जोडणी करिता इतर कांही तांत्रिक बाबींची पूर्तता करावयाची नाही हे वि.प.च्या लेखी अहवालावरुन स्पष्ट होते. त्यामुळे ३ महिन्याचे मुदतीनंतर वीज जोडणी न दिल्याने मंचाला या ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे आदेश देणे संयुक्तिक व कायदेशीर ठरते. विद्युत कायदा २००३ कलम ४३ नुसार वि.प.ने ग्राहकांनी मागणी केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा करणे त्यांचेवर बंधनकारक आहे, ती त्यांची जबाबदारी आहे आणि मंचाने ठराविक मुदतीत अशी वीज जोडणी द्यावी असे आदेश मंच करु शकते. परंतु वि.प.च्या अधिकाऱ्यांचे प्रामाणिक प्रयत्न दि. ३१.३.२०११ पर्यत वीज जोडणी देण्यासाठी विचारांत घेवून त्यांना १० दिवसांचा ज्यादा कालावधी देणे जरुरी वाटते.

या सर्व ग्राहकांना वीज जोडणी दि. ३१.३.२०११ पर्यंत देण्यात यावी. यात कसूर झाल्यास ग्राहक प्रतिनिधी मा. आयोगाकडे विद्युत कायदा २००३ कलम १४२ नुसार वि.प.विरुध्द कारवाई करण्यासाठी दादा मागू शकतात.

या ठिकाणी ग्राहक प्रतिनिधी यांनी वि.प. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयशी ठरली आहे. ग्राहकांना मुदतीत वीज जोडणी न दिल्याने विलंबापोटी भरपाईची मागणी तक्रारीत केलेली आहे. त्यामुळे विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– भरपाई मिळण्याचा ग्राहकाचा हक्क आहे. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी वितरण कंपनीने कबूल केल्याप्रमाणे दि. ३१.३.२०११ पर्यत वीज जोडणी दिल्यास ग्राहक आपली भरपाईची मागणीचा हक्क सोडून देत आहे असे सांगितले. त्यामुळे भरपाईबद्दल वि.प.विरुध्द आदेश देणेची मंचास आवश्यकता वाटत नाही. खालील प्रमाणे आदेश –

## <u>आदेश</u>

१) तक्रार क्र. ३७३, ३८०, ३८१, ३९९, ४००/२०१०–११ मंजूर करण्यात येत आहेत.

२) वितरण कंपनी कवठे महांकाळ अंतर्गत संबंधित उप विभागाने या पाचही ग्राहकांना त्यांच्या अर्जातील मागणीनुसार दि. ३१.३.२०११ पर्यंत किंवा त्यापूर्वी वीज जोडणी द्यावी व त्या आदेशाची पूर्तता केल्याचे मंचास त्वरित कळविण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

५) ग्राहकाने भरपाईचा आपला हक्क सोडून दिल्याने वेगळे आदेश दिले नाहीत.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.